On the auspicious day of March 10, 2024, a cherished dream blossomed into reality as the "RELA-X-THON" marathon unfolded, serving as a beacon of unity and compassion. More than 400 participants from across Goa, Maharashtra, and Karnataka, including numerous ultra-marathoners, united in harmony, weaving a tapestry of camaraderie.





















# खांडोळा महाविद्यालयाच्या मॅरेथॉन स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

वार्ताहर
माशेल

खांडोळा शासकीय महाविद्यालयातर्फे आयोजित केलेल्या रिलॅक्सथॉन या मॅरेथॉन स्पर्धेला धावपटूंचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. विविध गटातून साधारण ४०० धावपटूंनी या स्पर्धेत भाग घेतला. स्थानिक आमदार तथा क्रीडामंत्री गोविंद गावडे यांच्या उपस्थितीत माशेल येथील देवकीकृष्ण मैदानावर मॅरेथॉनची सुरुवात करण्यात आली.




माशेल : बावटा दाखवून मॅरेथॉन स्पर्धेला सुरुवात करताना मंत्री गोविंद गावडे. बाजूला प्राचार्य पूर्णकला सामंत व इतर.

यावेळी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य डॉ. पूर्णकला सामंत, उपप्राचार्य डॉ. डिलेक्टा डिकॉस्ता, डॉ. आशा गेहलोत हे उपस्थित होते. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी २० कि. मी. पल्ल्यातील मिश्र मॅरेथॉन प्रकारात डिचोलीच्या नारायण झांट्ये वाणिज्य महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी प्रथम तर केपेच्या शासकीय महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी द्वितीय पारितोषिक प्राप्त केले. आसगाव येथील ज्ञानप्रसारक महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना तृतीय पारितोषिक मिळाले. खुल्या प्रकारात दोन कि. मी. च्या पल्ल्यातील शर्यतीत पवनकुमार, सुरेश मुळगावकर व यशवंत परब यांना अनुक्रमे प्रथम क्रमांकाची तीन पारितोषिके प्राप्त झाली. ४० वयोगटाखालील विभागात यश गावकर, विशाल व साईरुद्र देसाई यांना पारितोषिके मिळाली. ५ कि. मी.च्या पल्ल्यातील शर्यतीत पुरुष गटामध्ये बाबू गावकर, विष्णू मीना व शिवनाथ यांना तर महिला गटात कुसूम खब्बेर, श्रीजा नाईक व स्वेलीशा कार्व्हालो यांना अनुक्रमे प्रथम क्रमांकाची तीन पारितोषिके प्राप्त झाली. १० कि. मी. पल्ल्यातील पुरुष गटात हरिश्चंद्र वेळीप, उदेश माजिक व साईश गावकर यांना तर महिला गटात रोहिणी शेटकर, सीमा नाईक व साक्षी चोडणकर यांना पारितोषिके प्राप्त झाली.

दिव्यांगासाठी घेण्यात आलेल्या २ कि. मी.च्या शर्यतीत साक्षी काळे हिने प्रथम तर रितेश वायंगणकर व संतोष गवस यांनी अनुक्रमे द्वितीय व तृतीय पारितोषिक पटकावले. व्हिलचेअरद्वारे सहभागी झालेल्या विशेष विभागात गणेश मराठे, मंगेश कुट्टीकर व मेसीस रॉड्रिगीस यांना प्रथम क्रमांकाची तीन पारितोषिके मिळाली. बक्षीस वितरण सोहळ्याला उद्योजिका श्रद्धा फडते, जिल्हा पंचायत सदस्य श्रमेश भोसले व अन्य मान्यवर उपस्थित होते. सूत्रसंचालन अनिकेत भगत, डॉ. रेश्मा खोलकर व प्रा. डिलायला आंताव यांनी केले. शारीरिक शिक्षण संचालिका रुपल च्यारी व योग विभागाच्या समन्वयक प्रा. अनिता रायकर यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले.


RELA-X-THON
1st Place


FINISH
RELAX
GPS Map Camera
Orgao, Goa, India
GX76+C3M, Marcel, Orgao, Betqui, Goa 403107, India
Lat 15.513982°
Long 73.959762°
10/03/24 07:25 AM GMT +05:30
Google

